# तहसिलदार, तथा तालुका दंडाधिकारी, वाशिम यांचे कार्यालय

सिव्हील लाईन वाशिम ता.जि.वाशिम-४४४५०५

Email Id :- www.tahsildarwashim1@gmail.com Phone No:- 07252-232008

---

क्र.कलि/प्रस्तु १/क.लि./कावी-२७६/२०१७ दिनांक :- १३/०४/२०१७

परिशिष्ट ड

(उपविधी नियम न-१०-१)

## बांधकाम परवाना

प्रती,

तिरुपती सुपर स्ट्रक्चर प्रा.लि.

वाशिम ता.जि.वाशिम

संदर्भ :- १. आपला बांधकाम परवानगी मिळणे बाबत चा अर्ज दिनांक २७.१२.२०१६

२. मा. जिल्हाधिकारी, वाशिम यांचे कार्यालयीन आदेश क्र.कक्ष-४/अका/महसुल/कावि-१५९/२०१५ दिनांक ०९.०४.२०१५

३. या कार्यालयाचे पत्र क्रमांक कल./प्रस्तु-१/कावि-८८७/२०१७ दिनांक ३०.१२.२०१६

४. या कार्यालयातील प्र.क्र./रा.मा.क्र./एन.ए.पी-३४/आडगाव न. काटा/१०/२०१६-०७ सुधारीत आदेश पारीत दिनांक १८.०२.२०१५

५. मा. सहाय्यक संचालक नगर रचना वाशिम यांचे कार्यालयीन पत्र क्र.बांधकाम नकाशे / मौ. आडगाव न. काटा/स.क्र.-१७/२/भुखंड क्रमांक-०२/ससंनरवा/२९१/दिनांक ३१.०३.२०१७

उपरोक्त विषयास अनुसरुन आपणास कळविण्यात येते की, संदर्भ क्रमांक २ चे आदेशान्वये या कार्यालयास महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम १९६६ चे कलम १८ अन्वये वर्ग- २ या गावांमधील जमीनीवरील विकास परवानगी व बांधकाम परवानगी देण्याचे अधिकार प्रदान करण्यात आलेले आहेत व संदर्भ क्रमांक १ अन्वये आपला बांधकाम परवानगीचा अर्ज या कार्यालयास प्राप्त झाला होता व तो तांत्रीक बाबीची तपासणी करुन अभिप्रायासह अहवाल सादर करण्याकरीता संदर्भ क्रमांक ०३ नुसार मा. सहाय्यक संचालक नगर रचना वाशिम यांचेकडे सादर करण्यात आला. संदर्भ क्रमांक ५ अन्वये मा. सहाय्यक संचालक नगर रचना वाशिम यांनी बांधकाम नकाशात सुचविलेल्या दुरुस्त्या प्रमाणे आपले बांधकाम प्रकरणात संदर्भ क्रमांक ४ अन्वये **मौजे आडगाव न काटा ता.जि. वाशिम येथील स.नं. १७/२ मधील दिलेल्या अकृषक आदेश दिनांक १४.०९.२००६ व सुधारीत आदेश दिनांक १८.०२.२०१५ मधील प्लॉट क्रमांक ०२ मधील क्षेत्र ९७५६.०० चौ.मी. प्रस्तावित जागेवरील इमारत बांधकाम नकाशास** महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम १९६६ चे कलम ४५ अन्वये खालील अटी व शर्तीच्या अधीन राहुन मंजुरी प्रदान करण्यात येवुन बांधकाम परवानगी देण्यात येत आहे.

**अटी व शर्ती-**

१. बांधकाम मंजुरी आदेश प्राप्त झाल्याचे तारखे पासुन सदर मंजुरी एका वर्षा पर्यंत वैध राहील.

२. मंजुर नकाशा प्रमाणे बांधकाम करण्यात यावे. व बाधकाम ज्या वापरासाठी मंजुर केले आहे तोच वापर करण्यात यावा.

३. नकाशात दुरुस्ती केल्या प्रमाणे बांधकाम करावे लागेल.

४. बांधकामात कोणत्याही प्रकारची सुधारणा करावयाची झाल्यास या कार्यालयाची पुर्व परवानगी शिवाय कोणतेही बांधकाम करता कामा नये.

# तहसिलदार, तथा तालुका दंडाधिकारी, वाशिम यांचे कार्यालय

सिव्हील लाईन वाशिम ता.जि.वाशिम-४४४५०५

Email Id :- www.tahsildarwashim1@gmail.com Phone No:- 07252-232008


---

५. जागेवर बांधकाम सुरु असतांना बांधकाम नियमा नुसार होत आहे, या बाबत वेळोवेळी त्यावर लक्ष ठेवावे व संबंधित वास्तुविशारद यांचेकडुन Plinth Checking व तदनंतर बांधकाम पुर्णत्वाचा (Completion Certificate) दाखला प्राप्त झाल्यावर व बांधकाम समाधानकारक झाले याची खात्री करुन तद्नंतरच नियमानुसार भोगवटा (Occupancy Certificate) प्रमाणपत्र देण्यात यावे.

६. महाराष्ट्र प्रादेशिक व नगर रचना अधिनियम १९६६ चे कलम १२४ अे नुसार विकास शुल्काचा भरणा करुन घेण्यात यावा.

७. इमारत बांधकाम पुर्ण झाल्या नंतर या कार्यालया कडुन वापर प्रमाणपत्र मिळाल्या शिवाय इमारतीचा वापर सुरु करण्यात येवु नये.

८. जागेच्या मालकी हक्का बाबत अथवा जागेच्या हद्दी बाबत कोणत्याही प्रकारचा वाद निर्माण झाल्यास त्यास अर्जदार सर्वस्वी जबाबदार राहील.

९. सांडपाणी व्यवस्थापनासाठी शुध्दीकरण पध्दतीने पुर्णवापर प्रक्रिया करण्या करीता स्वतंत्र युनिट तयार करुन स्वयंपाकघरातील व न्हाणीघरा मधील पाण्याचा पुर्नवापर करणे बंधनकारक आहे.

१०. महाराष्ट्र विघटनशिल व अघटनशिल कचरा (नियंत्रण) अध्यादेश २००६ नुसार टाकावू पदार्थ गोळा करण्या करीता आपल्या जागेत साठवुन ठेवण्या करीता दोन स्वतंत्र कचराकुंडया ठेवुन ओला व सुका कचरा ठेवण्याची जबाबदारी अर्जदार यांचेवर बंधनकारक राहील.

११. सदर इमारतीमध्ये आवश्यक त्या ठिकाणी नियमानुसार अग्निशमन यंत्रणा बसविण्यात यावी.

१२. प्रस्तावित बांधकाम हे भुकंप प्रतिरोधक असल्याची खात्री करुन घ्यावी व भुकंपा पासुन हानी होवु नये म्हणुन इमारतीच्या स्थैर्या बाबत इमारतीचे RCC डिझाईन सक्षम वास्तु विशारद यांचेकडुन करुन घ्यावे.

१३. प्रस्तावित बांधकामाच्या जागेमध्ये पावसाळी पाणी निचरा होण्याचे नैसर्गिक मार्ग/गटारे असतील तर ते अबाधित ठेवावेत किंवा त्यांची योग्य ती व्यवस्था करावी. कोणत्याही परिस्थितीत नैसर्गिक पाण्याचे मार्ग बंद करु नयेत.

१४. छतावरील पाणी साठविण्या करीता रेन वाटर हार्वेस्टींग बंधनकारक राहील.

१५. सौर उर्जेवर पाणी तापविण्याची यंत्रणा बसवुन विद्युत वापर कमी करण्या बाबत उपाययोजना करावी.

१६. बांधकामाचे परिक्षेत्रात महाराष्ट्र (नागरी क्षेत्र) झाडांचे संरक्षण व जतन अधिनियम १९७५ नुसार झाडे लावणे आपलेवर कायदेशिर बंधनकारक राहील.

१७. प्लास्टीक वापरा बाबत शासन व या कार्यालया कडुन वेळोवेळी होणाऱ्या आदेशाचे पालन करणे आपल्यावर बंधनकारक राहील.

१८. सांडपाण्याचा निचरा योग्यरित्या करणेची व त्या करीता उपाययोजना करणेची जबाबदारी विकासकाची राहील.

१९. इमारतीचे बांधकाम पुर्ण झाल्या नंतर ग्रामपंचायतची पाणी पुरवठा योजनेची नळजोडणी घेणे बंधनकारक आहे. अन्यथा भोगवटा प्रमाणपत्र देण्यात येणार नाही.

# तहसिलदार, तथा तालुका दंडाधिकारी, वाशिम यांचे कार्यालय

सिव्हील लाईन वाशिम ता.जि.वाशिम-४४४५०५

Email Id :- www.tahsildarwashim1@gmail.com Phone No:- 07252-232008


२०. बांधकाम करतांना रहदारीस अडथळा होणार नाही याची दक्षता घ्यावी. साहित्य रस्त्यावर असल्यास या कार्यालयाकडे जमीनभाडे भरावे लागेल.

२१. पाण्याचा निचरा करणे करीता आपणास स्वखर्चाने पक्की नाली बांधुन व्यवस्था करणे बंधनकारक असेल.

२२. बांधकामामुळे नियोजन प्राधिकरणाचे रस्त्याचे, नालीचे नुकसान झाल्यास त्याची आपणाकडुन भरपाई केल्या जाईल.

२३. सदरहु इमारतीस पाणी पुरवठा, विज पुरवठा तसेच दळणवळणासाठी W.B.N. चे रस्ते विकास करणे विकासकास बंधनकारक राहील.

२४. इमारतीचे बांधकाम करतांना FLY ASH चा जास्तीत जास्त वापर करणे तसेच बांधकाम भुकंपरोधक करणेच्या दृष्टिणे त्यानुसार उपाययोजना करणे बंधनकारक राहील.

२५. प्रस्तावित बांधकाम Rain Water Harvesting करणेचे बंधनकारक राहील.

२६. बहुमजली इमारतीचे Rcc Design आवेदकाने सक्षम Rcc Designer कडुन करुन घेणे बंधनकारक राहिल, त्यास हे कार्यालय कोणत्याही परिस्थितीत जबाबदार राहणार नाही.

२७. अभिन्यासातील खुल्या जागेवर सर्व भुखंडधारकांचा हक्क प्रस्तावीत होत असल्याने उक्त जागेवरील बांधकामास शैक्षणीक प्रयोजनार्थ मंजुरीची शिफारस असल्याने कोणत्याही भुखंडधारकांचा सुविधाधीकार बाधित होता कामा नये.

२८. अर्जदार यांनी सादर केलेली कागदपत्रे दिशाभुल करणारी किंवा खोटे असल्यास सदर परवानगी रद्द करण्याचे अधिकार हे कार्यालय राखीव ठेवीत आहे.

तहसिलदार तथा
नियोजन प्राधिकारी, वाशिम

प्रतिलिपी-

१. मा. सहाय्यक संचालक नगर रचना, वाशिम यांना माहिती करीता सविनय सादर.

२. सचिव ग्राम पंचायत आडगाव न काटा ता.जि. वाशिम यांना माहिती व उचित कार्यवाहीस्तव.

तहसिलदार तथा
नियोजन प्राधिकारी, वाशिम